# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.४० दिनांक १०/०४/२०२१

## मनाई आदेशाचे उंल्लघन करणा-यावर इसमांवर पालघर पोलीस दलाकडुन कारवाई

संपुर्ण महाराष्ट्रात कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता पालघर जिल्हयामध्ये लागु केलेल्या निर्बंधांचे पालन करणे कामी मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशान्वये सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पालघर पोलीस दलाकडुन दिनांक ०९/०४/२०२१ रोजी खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**१) वेळेचे बंधन मोडणा-या १४ दुकानदारवर भादविसं कलम १८८ प्रमाणे गुन्हे दाखल.**

- दिनांक ९/०४/२०२१ रोजी ११.४५ वाजता बस स्टॅन्ड जव्हार ता. जव्हार येथे यातील आरोपीत याने मनाई आदेशाचा भंग करून पान टपरी चालु ठेवुन लोकांची गर्दी करून पान विकत असतांना मिळुन आला म्हणुन पोनि/लेंगरे यांनी **जव्हार पोलीस ठाणे** गुन्हा.रजि.नं.II ३९/२०२१ भा. द. वि. सं. कायदा कलम १८८,२६९, २७०, व आपत्ती व्यावस्थापनअधि २००५ मधील कलम ५१(साथीचे रोग प्रतिबंधक कायदा कलम २,३,४ प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.
- दिनांक ०८/०४/२०२१ रोजी दुपारी १३.३० वा.चे सुमारास कुडूस बाजारपेठ ,ता.वाडा जि.पालघर येथे यातील आरोपीत याने आपले मालकीचे कमलेश ज्वेलर्स दुकान चालु असतांना मिळून आल्याने त्याला मा.जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील मनाई आदेश लागु असल्याचे माहित असुन देखील सदर मनाई आदेशाचा भंग केला आहे म्हणून पोनि/सुधीर संखे यांनी **वाडा पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र ११९/२०२१ भा.द.वि.सं.क.१८८, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ (ब) तसेच साथरोग प्रतिबंध कायदा कलम २,३,४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७(१),(३),१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.
- दि.०९/०४/२०२१ रोजी कासा पोलीस ठाणे हद्दीतील ०२ आरोपीत यांनी कोरोना रोगाचा प्रसार होवू शकतो हे माहीत असतांना त्यांनी कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) चा संसर्ग व प्रादुर्भाव फैलावण्यासाठी मदत करून मा.जिल्हाधिकारी, पालघर यांनी त्यांच्या कडील मा. जिल्हाधिकारी, पालघर यांची प्रेस नोट व मा. पोलीस अधिक्षक, पालघर येथील जिल्हा विशेष शाखा जा.क्र. जिविशा/टे-९/मा. जिल्हाधिकारी प्रेस नोट/२०२१-११३४/दि. ३१/३/२०२१ मनाई आदेश असताना मसालेची मिल व आशिर्वाद इंटरप्रायजेश नावाचे दुकानचालु ठेवुन आदेशाचा भंग केला म्हणून सपोनि/उमेश पाटिल यांनी **कासा पोलीस ठाणे** अनुक्रमे गुन्हा रजि.क्र.II ६९/२०२१,७०/२०२१ भा.द.वि.स. कलम १८८ प्रमाणे, गुन्हा दाखल केला आहे.
- दि.०९.०४.२०२१ रोजी २०.१५ वाजताचे सुमारास सातपाटी बाजार रोड सातपाटी येथे आरोपीत याने दिलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करुन त्यांचे ओम साई जनरल स्टोअर्स हे दुकान चालवित असतांना मिळुन आला म्हणुन सपोनि/सुधिर धायरकर यांनी **सातपाटी पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. II ३४/२०२१ भादविस कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.
- दि.०९/०४/२०२१ रोजी१९.०० वा. पाचमार्ग येथे यातील आरोपीत याने दिलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन करुन आरोपीत हा कृष्णा नोव्हल्टी दुकान उघडे ठेवुन चालवित असतांना मिळुन आला म्हणुन सपोनि/संतोष जाधव यांनी **तारापुर पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. II २६/२०२१ भा.द.वि.स. कलम १८८ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(बी) प्रमाणे, गुन्हा दाखल केला आहे.

- दि.०९/०४/२०२१ रोजी बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील ०८ आरोपीत यांनी बेस्टो टेलर्स चे दुकान, शिवम कलेक्शन नावाचे कपडयाचे दुकान, मास्क परीधान न करता भाजीपाल्याचे दुकान, रॉयल फुटवेअर दुकान, मास्क परीधान न करता ऑम्लेट, अंडाबुर्जीची हातगाडी, बोईसर डिझल  नावाचे दुकान, हेअर सलून दुकान, हार-फुलाचे दुकान इत्यादी चालु ठेऊन वरील आदेशाचे उल्लंघन केले आहे म्हणुन सपोनि/सुरेश सांळुके, पो.उपनिरीक्षक/रा.स.धुमाळ, पोउपनि/योगेश खोंडे यांनी **बोईसर पोलीस ठाणे** गुन्हा रजि.क्र. अनुक्रमे ।। १०४/२०२१, १०६/२०२१, १०७/२०२१, १०८/२०२१,१०९/२०२१,११०/२०२१,१११/२०२१,११२/२०२१ भादविस कलम १८८ आणि आपत्ती व्यवस्थापण कायदा सन २००५ मधील कलम ५१ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

**२) मास्क न परिधान केलेल्या ११५ इसमांवर कारवाई**

पालघर पोलीस दलाकडुन मा.जिल्हाधिकारी सो. पालघर यांचा कार्यालयीन आदेश क्र.जि.आ.व्य. पालघर/कोरोना.विषाणु/टाळेबंदी/आदेश/कावि/४७/२०२१ दि.२७/०३/२०२१ अन्वये मास्क न परिधान केलेल्या ११५ इसमांवर कारवाई करुन ४९,९५०/- रुपये दंड वसुल करण्यात आलेला आहे.

श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्यातर्फे जिल्हयातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव वाढत असुन तो रोखण्याकरिता महाराष्ट्र शासनाने दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा वरीलप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.